# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 10/06/2021 (गुरूवार)

(सायंकाळ)

---

### खून

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 10 कि. मी अंतरावर पो.स्टे. खापरखेडा पासुन ते दहेगाव सावनेर रोड वर पिपळा डाग बंगला येथे दिनांक 09/06/2021 ते दिनांक 10/06/2021 चे रात्री दरम्यान संतोष गोकुलनाथ सोलंकी(मृतक), वय 55 वर्ष, रा. रा. पिपळा डाग बंगला हा आपले राहते घरी पलंगावर झोपुन असता अज्ञात आरोपीने घराचे आत प्रवेश करुन लोखंडी टिकास ने मृतकाच्या डोक्यावर गंभीर वार करुन खुन केला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– जागेश्वर गोकुलनाथ सोलंकी, वय 50 वर्ष रा. ईसापुर आबादी, ता सावनेर, जि.नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 452, 302 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री अंधारे पो.स्टे. खापरखेडा मो.क्र. 9823150134 हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत चिचोली खापरखेडा येथे दिनांक 06/06/2021 चे 20.00 वा. दरम्यान ईश्वर मारोती कांबळे(मृतक), वय 42 वर्षे, रा. चिचोली वार्ड क्र 1, खापरखेडा हे त्यांचे राहते घराचे टेरीसवर गेले व पडल्याने त्यांना टेरीस वरील सिमेंट कॉलम मधील बाहेर निघालेली लोखंडी रॉड त्यांचे छातीत लागल्याने रक्त निघाले व डाव्या हाताच्या करंगळीत मार लागल्याने ते बेशद्ध झाले. त्यांना उपचाराकामी प्रथम पिएचसी चिंचोली व नंतर मेयो हॉस्पीटल नागपुर येथे नेले असता उपचारापुर्वी त्यांचा मृत्यु झाला. संबधीत कादपत्रे पो. स्टे. खापरखेडाला प्राप्त झाल्यावरून सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार कुर्वे पो. स्टे. खापरखेडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ जानुसिंग जाधव हे करीत आहे.

2) पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 3 कि. मी. अंतरावर नायगाव शिवार येथे दिनांक 08/06/2021 चे 14.00 वा. दरम्यान फिर्यादीचे वडील नामे– गोविंदराव बन्सी कोकाटे (मृतक), वय 65 वर्ष, रा. परसोडी दिक्षीत ता. नरखेड जि. नागपुर हे नायगाव ठाकरे शिवारात साहेबराव ढगे यांचे शेतात मजुरीचे कामाकरीता गेले होते. त्यादरम्यान त्यांना बोरच्या पेटीच्या वायरचा ईलेक्ट्रीक करंट लागल्याने त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दिपक गोवींदराव कोकाटे वय 30 वर्ष रा. परसोडी दक्षित ता. नरखेड जि. नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा संजय रिधोरकर 8007671986 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर